**प्रेस नोट** **दि १०/०४/२०१९**

## बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सार्वजनीक मंडळे व कार्यकर्ते यांची बैठक आयोजित केली

दिनाक १०/४/२०१९ रोजी सांयकाळी १७.१५ ते १८.०० वा चे दरम्यान पोलीस ठाणे हद्दीमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करणारे सार्वजनीक मंडळे व जागेवर प्रतिमा पुजन करणारे मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची पोलीस ठाण्यास बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकी मध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांनी आंबेडकर जयंती निमित्त,कायदा व सुव्यवस्था डी .जे , स्पीकर न लावण्याबाबत,ढोल पथका मध्ये टोल वाजवू नये,तसेच सदर बाबत कोणकोणत्या परवागी घ्यावी. जयंती साजरी करताना पोस्टर बॅनर्स लावू नये तसेच मिरवणूकी मुळे वाहतुकीस अडथळा होणार नाही या दृष्टीने योग्यते मार्गदर्शन केले. तसेच आगामी निवडणूकीच्या अनुषंगाने आर्दश आचारसंहितेचा भंग होईल असे कृत्य करु नये याबाबत मार्गदर्शन करुन सुचना देण्यात आल्या आहेत.तसेच उपस्थितांना पोलीसांनी त्यांच्या सोईकरिता सुरु केलेल्या भरोसा सेल,महिला सुरक्षा, पोलीस काका,बडी कॉप कम्युनिटि पोलीसींग बाबत माहिती देण्यात आली आहे.

सदर बैठकीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे,महिला पोलीस उप-निरीक्षक श्रीमती जाधव, पोलीस उप-निरीक्षक श्री.वाघमारे व गोपनीयचे कर्मचारी यांच्यासह डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करणारे सार्वजिनीक मंडळाचे एकूण ५० ते ६०पदाधिकारी/ कार्येकते हजर होते.




